**(कार्यालयीन वापरासाठी)**

| वर्ष | | | | वि.स.क्र | | | यादी भाग क्रमांक | | | अनु.क्रमांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | | | | | | | | | | | | |

================================================================

# नमुना ८

[ पहा नियम १३(१) आणि २६]

**मतदार यादीतील नोंदीच्या तपशीलामध्ये करावयाच्या दुरुस्तीसाठी अर्ज**

नजिकल्या काळातील समोरच्या बाजूने संपूर्ण चेहरा दिसेल असा पासपोर्ट साईज रंगीत छायाचित्र चिकटविण्यासाठी (३.५ से.मी. x ३.५ से.मी.) जागा

प्रति
मतदार नोंदणी अधिकारी,
……………………. विधानसभा / लोकसभा मतदार संघ

महोदय ,

उपरोक्त मतदार संघाच्या यादीतील माझ्या नावाची नोंद बरोबर नूसन सदर नोंद दुरुस्त करण्यात यावी, अशी मी विनंती करती/करते आहे. माझ्या विनंतीच्या पृष्ठयर्थ मी अचूक तपशील खाली देत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| I. अर्जदाराचा तपशील | नांव | | आडनाव (असल्यास) |
| मतदार यादी भाग क्रमांक : | | | भागातील अनुक्रमांक |
| १ जानेवारी ---------- #रोजी वय | वर्षे | महिने : | लिंग (पुरुष/स्त्री : |
| जन्म तारीख, ज्ञात असल्यास : | दिनांक : | महिने : | वर्षे : |
| *वडीलांचे / आईचे / पतीचे नाव | नांव | | आडनाव (असल्यास) |

| | |
|---|---|
| II. | सामान्यतः निवासाच्या ठिकाणाचा तपशील (पूर्ण पत्ता) : |
| घर क्रमांक : | |
| रस्ता/क्षेत्र /वसतिस्थान/ मोहल्ला/मार्ग : | |
| शहर/ गांव : | |
| डाक कार्यालय : | पिनकोंड : |
| तहसिल/तालुका/मंडळ/ठाणे : | |
| जिल्हा : | |

III. मतदार छायाचित्र ओळखपत्राबाबत तपशील (या किंवा इतर मतदारसंघात जारी केले असल्यास)

मतदार ओळखपत्र क्रमांक :

मतदार संघाचे नाव

IV. दुरुस्त करावयाचा नोंदीचा तपशील

या नमुन्यामध्ये वर दिलेल्या माहितीनुसार माझे नाव/वय/नाते/वडिलांचे/आईचे/पतीचे नाव/नाते/लिंग/पत्ता/मतदार छायाचित्र ओळखपत्र क्रमांक यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

| | |
|---|---|
| ठिकाण :<br>दिनांक : | मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा |

टीपः- कोणतीही व्यक्ती जे खोटे आहे असे तिला माहित आहे किंवा जे खोटे आहे असे तिला वाटते किंवा जे खरे आहे असे तिला वाटत नाही असे निवेदन किंवा प्रतिज्ञापन करील ती व्यक्ती लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ अन्वये शिक्षेस पात्र ठरेल.
# वर्ष नमूद करावे, जसे २००७, २००८ इत्यादी
* नको असलेला पर्याय खोडावा .

**केलेल्या कार्यवाहीचा तपशील**

(मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्याने भंरावयाचा)

श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------ यांच्या मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्यासाठी नमुना ८ मधील अर्ज *स्विकारला/ *नाकारला .

(नियम १८*/२०*/२६(४) $ खाली अर्ज स्विकारण्याबाबत किंवा (१७*/२०*/२६(४) $ खाली ) किंवा अनुसार नाकारण्याबाबत तपशीलवार करणे :

ठिकाण मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची सही (मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची मोहर)
दिनांक

* नको, असलेला पर्याय खोडावा
£ मतदार यादीच्या अंतिम प्रसिध्दीनंतर सततच्या पुनरिक्षणासाठी

---

**अर्जाची पावती**

**श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------ यांचा नमुना ८ मधील अर्ज प्राप्त झाला.
पत्ता / * -----------------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक --------------- मतदार नोंदणी अधिकाऱ्याच्यावतीने अर्ज स्विकारणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी

(पत्ता)-----------------------------------------

** अर्जदाराने भरावयाचे

***अधिक माहितीसाठी भेट द्या किंवा संपर्क करा:-**

**१) भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांचे संकेतस्थळ “www. eci.nic.in”**
**२) मुख्य निवडणूक अधिकारी ,महाराष्ट्र राज्य, यांचे संकेतस्थळ “www.ceo.maharashtra.gov.in”**
**३) टोल फ्री दूरध्वनी “१९५०”**

# नमुना ८ भरण्याकरीता मार्गदर्शक सूचना

## सर्वसाधारण सूचना

**नमुना ८ कोण दाखल करु शकतो**

१. जर एखाद्या व्यक्तीला मतदार यादीत यापूर्वीच छापून आलेल्या आपल्या नावांतील तपशिलात काही दुरुस्ती करावयाची असेल, तर ती व्यक्ती नमुना ८ दाखल करु शकते. एक व्यक्ती इतर कोणत्याही अन्य व्यक्तीच्या तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दाखल करु शकत नाही.

**नमुना ८ केव्हा दाखल करता येईल**

१. मतदार यादीत दाखल झालेल्या एखाद्या व्यक्तीच्या तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी नमुना ८ दाखल करता येऊ शकते. मतदारसंघाच्या प्रारुप मतदार यादीच्या प्रकाशन झाल्यानंतर नमुना ८ दाखल करता येऊ शकतो. तो अर्ज त्या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिवसांच्याआत दाखल करण्यात यावा. जेव्हा पुर्नरिक्षणाचा कार्यक्रम जाहिर करण्यात येईल तेव्हा उपरोक्त कालावधी संबंधात योग्य त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल.

२. अर्ज फक्त एका प्रतीतच दाखल करण्यात यावा.

३. अंतिम रित्या प्रकाशीत झालेल्या मतदार यादीमधून स्वत: संबंधातील असणा-या तपशीलात दुरुस्ती करण्यासाठीचा अर्ज, संपूर्ण वर्षभरात पुर्नरिक्षणाचा कार्यक्रम सुरु नसला तरी ही दाखल करता येऊ शकेल. पुनरिक्षणाचा कार्यक्रम चालू नसेल अशा वेळी अर्ज दुबार (दोन) प्रतीतच दाखल करण्यात आला पाहिजे.

**नमुना ८ कोठे दाखल करावा**

१. पुनरिक्षणाच्या कालावधीत अर्ज विर्निदिष्ट केलेल्या ठिकाणी जेथे मतदार यादीचा मसुदा लावलेला असेल (बहुतांशी मतदान केंद्राच्या ठिकाणी) तेथेच तसेच मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडेच दाखल करण्यात यावा.

२. पुनरिक्षणाचा कार्यक्रम चालू नसेल अशा त्या वर्षातील इतर कालावधीमध्ये अर्ज केवळ मतदार नोंदणी अधिका-याकडेच दाखल करण्यात यावा.

**नमुना ८ कसा भरावा**

१. अर्ज मतदार नोंदणी अधिका-याचे नावे करण्यात यावा. मसुदा मतदारयादी मधील प्रस्तावीत ज्या एखाद्या नोंदीच्या समावेशाबाबत त्या यादीतील नोंदणी केलेल्या दुस-या मतदारांने आक्षेप घेतला असेल तर को-या जागेत मतदारसंघाचे नाव नमूद करण्यात यावे.

२. नाव

३. अर्जाच्या भाग एक मध्ये मतदार यादीत तुमचे जे नाव असावे ते लिहावे, जर मतदार यादीत तुमच्या नावांची आद्याक्षरे छापण्यात आली असतील आणि जर तुम्हाला तुमच्या नावाचा विस्तार करुन हवा असेल तर तुम्ही तुमचे पूर्ण नाव, त्या विस्तारीत रुपात लिहावे. पहिल्या चौकनातून आडनाव खेरीज पूर्ण नाव लिहावे आणि दुस-या चौकनात आडनाव लिहावे. जर तुमचे आडनाव नसेल तर केवळ ठेवलेले नाव लिहावे. मतदारांच्या नावांचा किंवा आडनावांचा भाग म्हणून जातीचे नाव लावत असल्याखेरीज जात नमूद करण्यात येऊ नये. श्री, श्रीमती, कुमारी, खान, बेगम, पंडीत इत्यादीसांरखे सन्मानदर्शक अभिधाने नमूद करु नयेत. कृपया मतदार यादीच्या ज्या भागात तुमचे नाव सूचीबध्द केले आहे तो भाग क्रमांक व अनुक्रमांक लिहावा. हे बंधनकारक आहे.

४. वय

त्याचप्रमाणे मतदार यादी ज्यावर्षी छापण्यात येतअसेल त्या वर्षाच्या १ जानेवारीस असलेले तुमचे वय वर्षे व महिन्यात दर्शवावे. हा अर्हताकारी दिनांक मतदार यादीच्या प्रत्येक पानाच्या तळाशी छापण्यात येईल.

५..**लिंग**

दिलेल्या जागेत आपले लिंग उदा.पुरुष/स्त्री लिहावे. जर एखादा अर्जदार पुरुष किंवा स्त्री म्हणून सांगू इच्छित नसेल तर त्या अर्जदाराला त्याच्या लिंगाचा "इतर" म्हणून निर्देश करता येईल.

६. **.जन्मतारीख (कागदोपत्री पुराव्यासह)**

दिलेल्या जागेत आपली जन्मतारीख दिनांक/महिना/वर्ष याप्रमाणे भरावी.

सोबत जोडावयाचे जन्मतारखेबाबतचे पुरावे खालीलप्रमाणे आहेत

**(एक)** नगरपालिकेच्या प्राधिका-यांनी दिलेले जन्मदिन प्रमाणपत्र किंवाजन्म व मृत्यूची नोंद करणा-या जिल्हा निबंधकाच्या कार्यालयाने दिलेले जन्मदिन प्रमाणपत्र किंवा बाप्तिस्मा प्रमाणपत्र किंवा

**(दोन)** अर्जदार सर्वात शेवटी ज्या शाळेत गेला असेल त्या शाळेने (शासकीय/मान्यताप्राप्त) दिलेले किंवा इतर कोणत्याही मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेने दिलेले जन्मदिन प्रमाणपत्र किंवा

**(तीन)** ज्यांच्याकडे वरील पैकी कोणताही दस्ताऐवज नसेल अशा निरक्षर किंवा अर्धशिक्षीत अर्जदाराने त्याच्या वयाच्या पृष्ठ्यर्थ या आधीच मतदार यादीत ज्यांच्या नावाचा समावेश असेल अशा त्यांच्या पालकांचे विहित नमुन्यात भरलेले घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. मागणी केल्यावर नमुना प्रपत्र पुरविण्यात येईल.

जर अर्जदार इयत्ता १० किंवा अधिक वर्गात उत्तीर्ण असेल तर जन्मतारीख नमूद केलेले १०वीचे गुणपत्रक किंवा

**टिप** :- २६.०१.१९८९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेलेल्या अर्जदाराच्या बाबतीत केलेवळ नगरपालिकेच्या प्राधिका-यांनी दिलेले किंवा जन्म मृत्यूची नोंदणी करणा-या जिल्हा निंबधाकाच्या कार्यालयाने दिलेले जन्मदिनांक पत्रच स्विकार्य असेल.

**७.नातेसंबंधीचे नांव**

अविवाहित स्त्री अर्जदाराच्या बाबतीत आईचे/वडीलांचे नाव नमूद करण्यात यावे. विवाहित स्त्री अर्जदाराच्या बाबतीत पतीचे नाव नमूद करण्यात यावे. स्तंभातील लागून नसलेले पर्याय खोडावेत.

**८.सर्वसाधारण निवासाचे ठिकाण**

जथे तुम्ही सर्वसाधारणपणे निवास करतात व जेथे तुम्ही नांव नोंदवू इच्छितात, अशा ठिकाणाचा पिनकोडसह पूर्ण व संपूर्ण पत्ता त्याकरिता दिलेल्या जागेत लिहावा.

सर्वसाधारण निवासाचे पुढील पुरावे जोडण्यात यावे.

(अ) बँक/किसान/डाक कार्यालयाचे चालू पासबुक, किंवा

(ब) अर्जदाराची शिधापत्रिका /पारपात्र(पासपोर्ट)वाहनचालन परवाना, आयकर विभागाचा आदेश, किंवा

(क) त्या पत्त्यासाठी एकतर अर्जदाराच्या नांवावर असलेले किंवा त्याच्या/तिच्या पालक इत्यादि सारख्या निकटतम नातेवाईकांच्या नावावर असलेले अलिकडचे पाणी/दुरध्वनी/विज/गॅस जोडणी यांचे बिल किंवा

(ड) दिलेल्या पत्त्यावर अर्जदाराच्या नावांने आलेले/पाठविलेले डाक विभागाचे टपाल,

**टिप** :- जर एखादया अर्जदाराने, पत्याचा पुरावा म्हणून फक्त शिधापत्रिकाच सादर केली असल्यास, त्यास वरील प्रकारांपैकी पत्याबाबत आणखी एक तरी पुरावा सोबत जोडणे आवश्यक असेल.

**९.:<u>मतदार छायाचित्र ओळखपत्राचा सविस्तर तपशील :-</u>**

तुम्हाला यापूर्वीच निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र दिले असेल तर त्याकरीता दिलेल्या जागेत त्या ओळखपत्रावर नमूद केलेला क्रमांक (पुढील बाजूस छापलेला) व ओळखपत्र दिल्याचा दिनांक (मागील बाजूस छापलेला) नमूद करावा. कृपया दोन्ही बाजूनी स्वतः सांक्षाकीत केलेली ओळखपत्राच्या छायाचित्राची झेरॉक्स प्रत जोडावी

**१०. <u>दुरुस्ती करावयाच्या नोंदीचा तपशील :-</u>**

अर्जाच्या भाग चार मध्ये तुम्हाला दुरुस्त करुन पाहिजे असेलेल्या नोंदीचा तपशील लिहावा. म्हणून अर्जाचा हा भाग फारच महत्वाचा आहे. अर्जाचा भाग एक ते तीन मध्ये दिलेल्या जागेतर तुम्ही तुमचे नाव, वय, जन्मदिनांक नातेसंबधाीची नावे, लिंग, पत्ता व मतदार छायाचित्र ओळखपत्र इत्यांदीचा योग्य तो तपशील दर्शवावा या भागात तुम्ही आता दिलेल्या माहितीच्या आधारावर ज्या तपशीलात दुरुस्ती करावयाची आहे त्या तपशीलवार स्पष्टपणे खूण करावाी. कृपया ज्यामध्ये दुरुस्ती करावयाची नाही असे पर्याय खोडावेत.

देशाच्या बहुंताश भागात आता मतदारयादयांमध्ये मतदारांचे छायाचित्रे छापण्यात आली आहेत. अर्जदाराने चुकीचे छायाचित्र दुरुस्त करण्याबाबतचा अर्ज केला असेल तर अर्जदाराने अर्जाच्या भाग चार मध्ये "माझे छायाचित्र"असे लिहावे आणि शक्य असल्यास अर्जाबरोबर आपले अलिकडच्या काळातील रंगीत छायाचित्र जोडावे